नियमित दिवाणी दावा कमांक 129/2014
(CNR NO. MHNS13-001226-2014)

**नियमित दिवाणी दावा कमांक 129/2014**

**मधील निशाणी कमांक 5 वरील आदेश**

**कृपालदास महाराज विरुध्द बाळकृष्ण पवार आणि इतर**

अर्ज, शपथपत्र आणि सामनेवालाचा जबाब वाचला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

2. प्रस्तुतचा दावा हा निरंतरच्या ताकिदीसाठी दाखल केला आहे. अर्जदाराचे म्हणणे असे की, शेत जमिन गट कमांक 2409 शिवार ओझर, ता. निफाड, जि. नाशिक ही मुंबई–आग्रा महामार्गाच्या लगत असून, महामार्गाच्या पूर्व बाजूस उत्तर–पूर्व कोप–यात पंचवड गणेश मंदीर आहे. ते गणेश मंदीर प्राचीन काळापासून असून प्रसिध्द असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक तेथे दर्शनासाठी येतात. गणेश मंदीरात महंत श्री रामस्वरुप महाराज हे पुजा अर्चा करतात. मंदीर परिसरात अर्जदाराने भाविकांच्या मदतीने पिंपळ, लिंब, आंबा, चिंच इत्यादी झाडांची लागवड केली असून ते विना मोबदला मंदीराच्या परिसराची स्वच्छता करतात आणि भाविकांची सेवा करतात. सामनेवाला कमांक 1 ते 3 यांनी प्राचीन गणेश मंदीर नष्ट करण्याच्या उद्देशाने दिनांक 20/11/2014 रोजी मंदीर परिसरातील झाडे तोडण्यास सुरुवात केली. सामनेवाला यांच्या कृत्याला विरोध केला असता, त्यांनी झाडे तोडून मंदीर नष्ट करण्याची धमकी दिली. म्हणून, प्रस्तुतचा अर्ज दाखल झाला आहे.

3. समन्स मिळाल्याने सामनेवाले हजर झाले. निशाणी क्रमांक 23 वर कैफियत, अर्जास जबाब आणि प्रतिदावा दाखल केला. सामनेवाले यांच्या लेखी जबाबावरुन असे दिसून येते की, दावा मिळकतीचा मूळ सर्व्हे नंबर 653 होता. मूळ मालक श्री. पांडूरंग कुलकर्णी यांनी ती मिळकत सामनेवाले यांचे आजोबा महादू पगार आणि नामदेव शेजवळ यांना दिनांक 23/04/1940 रोजी एकत्रित खरेदीखताव्दारे विकली. त्या मिळकतीतून पुढे मुंबई–आग्रा महामार्ग गेल्याने मूळ सर्व्हे नंबर 653 चे दोन भाग झाले. त्यापैकी एक भाग हा सामनेवाले यांचे आजोबा महादू पगार यांच्या ताब्यात आला. महादू पगार हे 07/11/1979 रोजी मयत झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा लक्ष्मण पगार, पत्नी राहीबाई आणि मुलगी विठाबाई यांच्या नावे नोंद झाली. महादू पगार हे सर्व्हे नंबर 653/1 ही मिळकत मालकी हक्काने वहिती करु लागले. गावी गट स्कीम योजना आल्याने सर्व्हे नंबर 653/1 ला गट नंबर 2409 देण्यात आला. दिनांक 30/10/2000 रोजी सामनेवाले यांचे वडील लक्ष्मण मयत झाले. त्यामुळे ती मिळकत वारसा हक्काने सामनेवाले यांच्या नावे आली. सामनेवाले हे त्या मिळकतीचे मालक असून, ते स्वतः वहिती करतात. सामनेवाले यांनी त्या मिळकतीत स्वखर्चाने सन 2001 मध्ये गणेश मंदीर बांधले असून, ती खाजगी मालमत्ता असल्याने त्याची कुठेही नोंद झाली नाही. अर्जदाराचा त्या मंदीराशी कोणताही संबंध नाही. अर्जदाराने दावा मिळकत ही फुकटात मिळविण्याच्या दुष्ट हेतुने हा अर्ज दाखल केला आहे.

4. अर्ज, सामनेवाला यांनी सादर केलेले लेखी म्हणणे तसेच, प्रस्तुत प्रकरणात सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाला यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले.

त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अनु.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1) | अर्जदार यांनी प्रथम दर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| 2) | अर्जदारांच्या बाजूने न्यायाचा तराजू आहे काय ? | नाही. |
| 3) | तुर्तातूर्त मनाईचा आदेश न दिल्यास अर्जदार यांचे नुकसान होणार आहे काय ? | नाही. |
| 4) | आदेश काय ? | अर्ज नामंजूर केला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा कमांक 1 ते 3 बाबत :–**

5. सदरचे तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच सोईसाठी तिन्ही मुद्दे मी एकत्रितपणे चर्चेसाठी घेतले आहेत.

6. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे जमिन गट नंबर 2409 मध्ये प्राचीन गणेश मंदीर असून, तिथे महंत श्री रामस्वरुप महाराज हे मनोभावे निस्वार्थ

हेतूने गेली अनेक वर्षे सेवा करीत आहे. सामनेवाले हे ते गणेश मंदीर नष्ट करण्याच्या विचारात आहे. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तो स्वतः त्या मंदीराची देखभाल करीत असून तो विनामोबदला मंदीर परिसरात स्वच्छता करतो.

7. प्राचीन गणेश मंदीर अर्जदाराच्या ताब्यात आहे, असे दाखविण्यासाठी अर्जदाराने विज बील, पोलीस अधिक्षक यांना दिलेला अर्ज, वर्तमान पत्रात छापून आलेल्या बातम्या आणि कार्यक्रम पत्रिका यांचा आधार घेतला. त्या दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, तिथे महंत श्री रामस्वरुप महाराज पूजा अर्चा करतात. त्यांनी मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांना ती जागा मंदीरास मिळावी म्हणून सन 2011 मध्ये अर्ज दिला होता. दिनांक 03/12/2010 रोजी सहा. पोलीस निरीक्षक यांनी त्या मंदीरासंदर्भात महंत श्री रामस्वरुपदास महाराज यांना पत्र दिले आहे. विद्युत बिलाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, ते स्वामी स्वरुप गणेश मंदीर यांच्या नावे आहे. वृत्तपत्रातील बातम्यांमध्ये सुध्दा महंत रामस्वरुपदासजी अशा नावाचा उल्लेख आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या संपूर्ण दस्तऐवजात अर्जदाराचे कुठेही नाव नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार हा पंचवड गणेश मंदीर येथे महंत म्हणून पूजा अर्चा करतो, हे त्याचे कथन ग्राहय धरता येणार नाही.

8. त्याउलट जमिन गट क्रमांक 2409 ही सामनेवाला यांची असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल आहे. तसेच, अर्जात किंवा दाव्यात त्या जमिनीशी सामनेवाला यांचा कोणताही संबंध नाही, असेही अर्जदाराचे कथन नाही. अशा परिस्थितीत, अर्ज मंजूर केल्यास निश्चितच

सामनेवाला यांचे नुकसान होणार आहे, म्हणून वर नमूद सर्व चर्चा लक्षात घेवून मुद्दा कमांक 1 ते 3 चे उत्तर त्याप्रमाणे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा कमांक 4 बाबत</u> :–**

9. मी, मुद्दा कमांक 1 ते 3 चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत. सबब, मी मुद्दा कमांक 4 च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/–
(विजय सी. गवई)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पिंपळगांव बसवंत, ता. निफाड

दिनांक – 29/06/2018